प्रजावाणी दि. 11/08/2022.

# चोरीच्या तीन दुचाक्या जप्त

## ▪ माहूर पोलिसांची कारवाई ▪ चोरटा जेरबंद



माहूर, (वार्ताहर) दि. १० : येथील श्रीदत्त शिखर येथे काही महिन्यापूर्वी भाविकांच्या दुचाक्या चोरीला गेल्या होत्या. या प्रकरणी खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीवरुन माहूर पोलिसांनी तपास केला. दुचाक्या चोरट्यास यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा येथे न्यायालय परिसरात सापळा रचून अटक करण्यात आली.

विशाल भवरे हे भाविक जुलै महिन्यात श्री शिखर मंदिर येथे दिवसा दर्शनासाठी गेले होते. त्यावेळी त्यांची हिरो पॅशन ही दुचाकी चोरीला गेली होती. तर प्रविण जाधव यांची दुचाकी एप्रिल महिन्यात माहूर येथून रात्री घरासमोरून चोरीला गेली होती. तसेच माहूर येथील उर्स यात्रेतून बजाज ग्लॅमर ही दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केली होती. या सर्वच चोरीप्रकरणी फिर्यादींच्या तक्रारीवरून माहूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता.

या प्रकरणी माहूर पोलीस हे चोरट्याचा शोध घेत होते. त्यावेळी विदर्भातील आर्णी तालुक्यातील नितीन जनार्दन बोरचाटे (वय ... रा, चिकनीकसबा) हा दुचाक्यांची चोरी ...न ग्रामीण भागात विकत असल्याची माहिती खबऱ्याकडून पोलिसांना मिळाली. बिट जमादार विजय आडे, पोलिस कॉन्स्टेबल प्रकाश देशमुख, होमगार्ड एस. जी. रजाक हे सदर आरोपीच्या शोधात होते. तेव्हा तो यवतमाळ जिल्हयातील दारव्हा येथील न्यायालय परिसरात असल्याची पक्की माहिती पोलिसांना मिळाली.

या माहितीवरुन पोलिसांनी सापळा रचून नितीन बोरचाटे याला अटक केली. त्याला माहूरला आणले असता त्याने सदर गुन्ह्याची कबुली दिली. त्याने चोरुन नेलेल्या तीन दुचाक्या जप्त केल्या आहेत. त्याला न्यायालयात हजर केले असता चार दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. त्याच्याकडून अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, उपविभागिय पो. अधिकारी विजय डोंगरे, पोनि. नामदेव रीठ्ठे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि अण्णासाहेब पवार, संजय पवार, श्रीधर जगताप, विजय आडे, बाबू जाधव, प्रकाश देशमुख यांनी ही कारवाई केली आहे.

देशोन्नती दि. 11/08/2022

# पोलिसांनी दोन आरोपींना घेतले ताब्यात; दोन गावठी पिस्तूल, १२ जिवंत काडतूस जप्त

## वजिराबाद डीबी पथकाची कारवाई

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ▪ वजिराबाद ठाण्याच्या डीबी पथकाने शहरातील वेगवेगळया ठिकाणी दोन आरोपींना १० ऑगस्ट रोजी ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून दोन गावठी पिस्तूल व १२ जिवंत काडतूस जप्त केले आहेत.

पोलिस अधिक्षक प्रमोदकुमार शेवाळे, अप्पर पोलिस अधिक्षक निलेश मोरे, विजय कबाडे यांनी शहरात अग्नीशस्त्राचा वापर करुन घडत असलेल्या गुन्ह्यातील आरोपींचा प्रतिबंध करण्याचे आदेश ... दिले आहेत. ... मिळालेल्या गुप्त माहितीवरुन डीबी पथकाचे प्रमुख सपोनि. संजय निलपत्रेवार व त्यांच्या पथकातील कर्मचाऱ्यांनी १० ऑगस्ट रोजी एका डी गँग सदस्याकडे पिस्तूल असून तो डॉ. खुरसाळे हॉस्पीटल समोरील मार्गावर असल्याची माहिती मिळाल्यावरुन पोलिस पथकाने रवी उर्फ रवी लाला ठाकूर यास पकडण्याचा प्रयत्न केला असून तो पळून जाण्याच्या प्रयत्नात असतांना झडप घालुन त्याला ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे एक गावठी ... जिवंत काडतूस आढळून आले असून पोलिसांनी ते जप्त केले. तर दुसऱ्या कारवाईत बोरबन फॅक्ट्री परिसरात आनंद उर्फ चिन्नू यादव यास ताब्यात घेवून त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे एक अत्याधुनिक पिस्तूल, १० जिवंत काडतूस व एक मॅग्झिन आढळून आले असून पोलिसांनी ते जप्त करुन दोघांनाही ताब्यात घेतले. या प्रकरणी वजिराबाद पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या पथकात विजयकुमार नंदे, गजानन किडे, मनोज परदेशी, शरदचंद्र चावरे व इतर पोलिस कर्मचाऱ्यांचा समावेश होता.